॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.१४ (          )  सर्वच क्षेत्रात स्पर्धा वाढली असून जिद्द व मेहनतीशिवाय यश प्राप्त होणे शक्य नाही. त्यामुळे ज्योतिषावर विश्वास न ठेवता परीश्रम करा आणि व्यसनापासून दूर राहा असा सल्ला वैद्यकीय शिक्षण व जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी युवारंग युवक महोत्सवाचे उद्घाटन करताना कलावंत विद्यार्थ्यांना दिला.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यापीठस्तरीय युवक महोत्सवाला गुरुवार दि. १४ फेब्रुवारी पासून विद्यापीठाच्या प्रांगणात प्रारंभ झाला. सायंकाळी या महोत्सवाचे उद्घाटन श्री.गिरीश महाजन यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी कुलगुरु प्रा. पी.पी. पाटील होते. यावेळी मंचावर आमदार राजूमामा भोळे, प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर, महोत्सवाचे कार्याध्यक्ष तथा व्य.प.सदस्य दिलीप पाटील, कुलसचिव भ.भा.पाटील, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक प्रा.सत्यजित साळवे, समन्वयक प्रा.अजय पाटील उपस्थित होते.

यावेळी बोलताना श्री.महाजन यांनी आपल्या महाविद्यालयीन आठवणींना उजाळा दिला. महाविद्यालयात सात-आठ नाटकांमध्ये काम केले. मात्र त्या काळात महिला पात्र करायला कोणी तयार होत नसत. अशावेळी तीन-चार नाटकांमध्ये महिला पात्र आपल्याला करावे लागले अशी आठवण करुन देताना श्री.महाजन पुढे म्हणाले की, जेव्हा मला पुरुष पात्र मिळाले तेव्हा पुढाऱ्याची भूमिका मिळाली. ती भूमिका आजतागायत वठवत आहे. महाविद्यालयीन शिक्षण घेताना सात वर्ष विद्यापीठ प्रतिनिधी म्हणून निवडून आलो. पुढे ग्रामपंचायत आणि पाच वेळा आमदार म्हणून निवडून आलो. मी क्रीडापटू होतो, मात्र राजकारणात करिअर करायचे हा निर्धार पक्का होता आणि त्यात यश प्राप्त होत गेले. तेव्हा तरुणपिढीने देखील ज्या क्षेत्रात करिअर करायचे आहे ते क्षेत्र निवडल्यानंतर जिद्द आणि मेहनत करावी म्हणजे यश प्राप्त होईल. मागे वळून बघू नका,  घरबसल्या देव अथवा ज्योतिषी यश देत नाही. ज्योतिषावर विश्वास ठेवू नका, परीश्रमाशिवाय पर्याय नाही असा सल्ला देत तरुणपिढी व्यसनाधिन होत असल्याबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली. देश महासत्ता बनवायचा असेल तर व्यसनापासून दूर राहा, व्यायाम करा असे आवाहन केले.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांनी जिल्हावार युवक महोत्सवाच्या आयोजनामुळे महाविद्यालयांच्या सहभागात वाढ झाली असून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढला आहे. विद्यार्थिनींची संख्या विद्यार्थ्यांपेक्षा वाढली आहे असे मत व्यक्त केले. पुढील शैक्षणिक वर्षापासून कवयित्री बहिणाबाई चौधरी विद्यार्थी साहित्य संमेलन घेतले जाणार असल्याची घोषणा त्यांनी केली. विद्यापीठात लोककला अकादमी स्थापन करण्यासाठी राज्य शासनाने मदत करावी अशी अपेक्षा कुलगुरुंनी व्यक्त केली.

आमदार राजूमामा भोळे यांनी अशा महोत्सवातून विद्यार्थ्यांना कलागुण सादरीकरणाची संधी प्राप्त होते. शिक्षण घेत असताना अशा कला जोपासल्या तर त्याचा भविष्यात फायदा होतो असे सांगून व्हॅलेंटाईन डे च्या दिवशी हा महोत्सव होत असल्याबद्दल आनंद व्यक्त केला. दिलीप पाटील यांनी भाषणात जिल्हावार महोत्सवांमुळे छोटया महाविद्यालयांमध्ये समुह नेतृत्व विकसित होत आहे असे सांगितले. या महोत्सवामधून सुजाण नागरिक निर्माण होतील अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

प्रारंभी विद्यार्थी विकास संचालक प्रा.सत्यजित साळवे यांनी प्रास्ताविक केले. वर्षा उपाध्ये या विद्यार्थिनीने महोत्सवाची सामुहिक प्रतिज्ञा दिली. तळोदा येथील महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी आदिवासी बोलीभाषेतील स्वागत गीत सादर केले.  बी.पी.कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चाळीसगाव, रायसोनी इन्स्टिटयटू, जळगाव, कुसुंबा

येथील कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, तळोदा या चार महाविद्यालयांनी जिल्हावार युवक महोत्सवाचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल या महाविद्यालयांचे प्राचार्य व समन्वयक यांचा सत्कार पाहुण्यांचा हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा.जी.ए.उस्मानी, डॉ.आशुतोष पाटील, प्रा.जतीन मेढे यांनी केले. प्रा.अजय पाटील यांनी आभार मानले. या कार्यक्रमास व्यवस्थापन परिषद सदस्य, सिनेट सदस्य उपस्थित होते.

उद्घाटनानंतर सोहम डिपार्टमेंट ऑफ योगा ॲण्ड नॅचरोपॅथिचे पंकज खासबाग यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी योगाचे सादरीकरण केले. त्यानंतर प्रवीण माळी यांचा `आयतं पोयतं सखानं` हा एकपात्री प्रयोग सादर झाला. मंत्री गिरीश महाजन यांनी या कार्यक्रमाचा आस्वाद घेतला. या महोत्सवात ३१० विद्यार्थिनी आणि २८६ विद्यार्थी यांचा समावेश आहे. याशिवाय साथसंगत करणारे कलावंत आणि संघव्यवस्थापक दोनशेपेक्षा अधिक आहेत.

प्रत्यक्ष स्पर्धांना उदया शुक्रवारी सकाळी ८ वाजता प्रारंभ होणार आहे.स्टेज क्र.१ दीक्षांत सभागृहात मिमिक्री, मुकनाट्य, विडंबन व समुह लोकनृत्य या स्पर्धा होतील. स्टेज क्र. २ म्हणजे सिनेट सभागृहात भारतीय लोकगीत, सुगम गायन (पाश्चिमात्य), सुगम गायन (भारतीय), समुहगीत (भारतीय) व भारतीय लोकसंगीत या स्पर्धा होणार आहेत. रंगमंच क्र. ३ अर्थात डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम विद्यार्थी भवनात शास्त्रीय गायन, शास्त्रीय वादन (सूरवाद्य), समुह गीत (पाश्चिमात्य), शास्त्रीय नृत्य व शास्त्रीय वादन (तालवाद्य) या स्पर्धा होतील. रंगमंच क्र. ४ म्हणजे सामाजिक शास्त्र प्रशाळा सभागृहात काव्यवाचन, वक्तृत्व व वादविवाद स्पर्धा होणार आहेत. रंगमंच क्र. ५ व ६ हे विद्यापीठाच्या ग्रंथालयात राहणार असून याठिकाणी रांगोळी, क्लेमॉडेलिंग, फोटोग्राफी, इन्स्टॉलेशन, मेहंदी, कोलाज, स्पॉटपेंटींग, व्यंगचित्र आणि चित्रकला या स्पर्धा होणार आहेत.

---

जा.क्र: कबचौ उमवि/१६/हस्तदेय/२०१९ दिनांक : १४ फेब्रुवारी, २०१९

प्रति,
मा. संपादक / प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
(डॉ. सुनील पाटील )
जनसंपर्क अधिकारी